# कार्यालय नगर परिषद, बल्लारपूर

## प्राथमिक शिक्षण विभाग

## ई-निविदा सुचना

ई-निविदा सुचना क्र./नपब/शिवि/ ५५०० /2026 दिनांक :- 13 /5 /2026

या निविदा सुचनेव्दारे खालील नमूद केलेल्या कामाकरीता ई-निविदा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सूचनेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यास उपलब्ध आहे. तरी इच्छुक कंत्राटदारांनी आपली ई-निविदा सदर वेबसाईटवर सादर करावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा प्रपत्र किंमत रु. | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | नगर परिषद बल्लारपूर व्दारा संचालित प्राथमिक व माध्यमिक शाळा व कॉन्व्हेंट विद्यार्थ्यांकरीता नोटबुक्स पुरवठा करणेबाबत. | 1000/- | 10000/- |

**अटी व शर्ती** :-

1. निविदा प्रपत्राची किंमत, अनामत रक्कम ही SBI नेट बँकिंग सुविधेने भरणा करावी.(DD व्दारा भरणा करु नये)
2. कमी अथवा जास्त दराची निविदा स्विकारणे अथवा कोणतेही कारण न दर्शविता सर्वच निविदा रद्द करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहे.
3. नोंदणीकृत मक्तेदारी अधिकृत DSC प्राप्त करुन महाराष्ट्र शासनाचे http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर स्वत: नोंदणी करुन केवळ ई-निविदा पद्धतीने निविदा सादर करावी.
4. निविदाधारकाने संगणक प्रणालीवर ई -निविदा भरतांना आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र (Shop ACT.), अनामत रक्कम, आयकर रिटर्न्स प्रमाणपत्र (चालु वर्षाचे ), जीएसटी प्रमाणपत्र, व्यवसाय कर प्रमाणपत्र व परिशिष्ठ अ इ. कागदपत्रे स्कॅनिंग करून सादर करणे आवश्यक आहे.
5. निविदाधारकांनी दर नमुद करतांनी सर्व करासहित दर नमुद करावे. देयकात अतिरिक्त कर देण्यात येणार नाही.
6. मा.संचालक नगर परिषद संचालनालय मुंबई यांचे स्थायी निर्देश 36 नुसार वरील कामामध्ये नगर सेवकांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे प्रतिज्ञापत्र परिशिष्ठ अ प्रमाणे विहित नमुन्यात 100/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहुन देणे बंधनकारक राहील. सदर प्रतिज्ञापत्र शिवाय सादर केलेली निविदा स्विकारण्यात येणार नाही.
7. कंत्राटदाराला देय असणाऱ्या देयकातून शासनाच्या नियमाप्रमाणे शासनाचे कर परस्पर कपात करण्यात येईल.
8. कंत्राटदाराच्या प्रत्येक देयकातून 10 टक्के सुरक्षा ठेव कपात करण्यात येईल. कपात केलेली रककम लेखा परीक्षण झाल्यानंतर लेखा परीक्षणात लेखा आक्षेप आल्यास आक्षेपीत रक्कम कपात करुन उर्वरीत रक्कम परत करण्यात येईल. जर लेखा आक्षेपीत रक्कम कमी पडत असल्यास नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत औद्योगिक नगरी अधिनियम अन्वये आपल्याकडुन वसुन करण्यात येईल. निविदा पुर्व बैठकिस सर्व साहित्याचे नमुने घेऊन येणे बंधनकारक राहील तसेच ते मंजुर करणे आवश्यक राहील व त्याच दर्जाचे साहित्य पुरवठा करणे बंधनकारक राहील.
9. नगर परिषदेची आर्थिक स्थितीनुसार देयक प्रदान करण्यात येईल.
10. पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्याची सविस्तर माहिती नोटबुक्सचे साईज प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापक /मुख्याध्यापिका तसेच शिक्षण विभाग प्रमुख यांचे संपर्कात राहुन प्रत्यक्ष शाळेत जाऊन अचुक माहिती गोळा करुन आवश्यकतेनुसार नामांकित कंपनीचे /उत्कृष्ट दर्जाचे साहित्य आणून पोहचता करुन पोच पावती देयका सोबत सादर करावे अन्यथा देयक प्रदान करण्यात येणार नाही.
11. साहित्य पुरवठा करण्यास विलंब केल्यास प्रति दिवस रुपये 500/- प्रमाणे आपले देयकातून दंड वसुल करण्यात येईल.
12. पुरवठा केलेल्या साहित्यामध्ये कोणत्याही प्रकारचा दोष आढळून आल्यास अथवा नामांकित कंपनीचे / उत्कृष्ट दर्जाचे नसल्यास ते स्वत:च्या खर्चाने परत नेऊन बदली करुन नामांकित कंपनीचे /उत्कृष्ट दर्जाचे साहित्य आणुन देणे बंधनकारक राहील.

श्री विशाल वाघ
मुख्याधिकारी
नगर परिषद बल्लारपूर

Signature Not Verified
Digitally signed by MONIKA BABANRAO DHOKE
Date: 2026.05.14 13:38:12 IST
Location: Maharashtra-MH